# मकर संक्रांत

गुलाबी थंडीने आपल्या अंगावर काटा आला आणि पोळून गुलाबी झालेले हात फिरवता फिरवता हलव्याच्या अंगावर साखरेचा देखणा काटा आला की संक्रांत येते.

संक्रांत म्हटलं की पहिले आठवतात ते तिळाचे लाडू. तिळातला स्नेह, गुळातली गोडी आणि डाळं–शेंगदाणे–खोबरं यांची लज्जत यांची या सणाला देवाणघेवाण होते; वर्षभर गोड बोलायचा करार होतो. तिळाच्या वड्या, गूळपोळी हेही पदार्थ असतातच.



तिळाचे लाडू

आमच्या लहानपणी खादाडीला सुरुवात होई ती धुंधुर्मासाच्या, वाफाळ–तुपाळ मुगातांदळाच्या खिचडीने. मग यायची भोगीची सोलाणे–शेंगदाणे–पापडी घातलेली उकडहंडी. हे दाणे या दिवसात मुबलक मिळत. बोरांचा हंगाम देखील हाच. देवाजीने असं भरभरून दिलं की हात आपोआप नमस्काराला जुळत. शेंगदाणे, सोलाणे, बोरं, उसाचे करवे, आणि हळकुंडं–हिरव्या बांगड्या, अशीं सौभाग्यचिन्हं मातीच्या बोळक्यात म्हणजेच सुघटात किंवा सुगडात घालून, तीं हळद–कुंकवाच्या नक्षीने सजवून, सुवासिनी त्यांची पूजा करत. ही बोळकी काळ्या रंगाची असत. एरवी हिन्दुधर्मात अशुभ मानल्या जाणाऱ्या काळ्या रंगाला संक्रांतीच्या दिवशी मात्र शुभ मानलं जाई. म्हणूनच, छोट्या बाळाला त्याच्या पहिल्या संक्रांतीला काळं झबलं आणि  हलव्याचे दागिने घालत. घरच्या, शेजारच्या सगळ्या लहान मुलांना बोलावून चौफेर बसवत. मधोमध बाळाला बसवून त्याच्या डोक्यावर मूठमूठ बोरं उधळत. हेच बोरन्हाण.



हलव्याचे दागिने



हळदीकुंकवाची तयारी

घरच्या नव्या सुनेचीदेखील, संक्रांतीला, काळी साडी देऊन, सासूबाई ओटी भरत आणि तीसुध्दा ती नवी काळी साडी नेसून, हलव्याचे दागिने लेऊन नटत असे. लग्नानंतर पहिली पाच वर्षं फणी, आरसा, करंडा अशी सौभाग्यचिन्हं वाण म्हणून वाटायची पध्दत होती.  आणि त्यानंतर मात्र अन्नब्रह्माशी, स्वयंपाकाशी, संबंध असलेली काहीतरी वस्तू वाणात लुटत असत. वाणं लुटायची पध्दत अजूनही चालू आहे. बायका हळदीकुंकवाला अगदी दे–वाण–घे–वाण, वाणं लुटतात आणि मग देवाणीचं बील आलं की नवऱ्यांना वाणी लुटतात.

संक्रांतीच्या पतंगांचा मान एरवीच्या पतंगांपेक्षा वेगळा. त्यांच्या मांजाला खास खळ लावून त्याच्यावर रांगोळीच्या बाऽऽरीऽऽक भुकटीचा लेप लावलेला असे. त्यामुळे तो मांजा कटत नसे, तो बाकीचे पतंग काटत असे. पण हे कधी, तो आभाळात उडाल्यावर. त्याच्या आधी तो हाताला मस्त काचत असे. मांजा लागून रक्त आलं तर तो शुभशकुन समजला जाई. असा रक्तचर्चित मांजा उत्तुंग आणि उत्तम लढवय्या बने. अशा मांजाने काटलेले पतंग, मग मुंबईत, विजेच्या तारांना, माडांच्या शेंड्यांना अडकून कित्येक दिवस लटकत रहात. अजूनही कधी माडाच्या शेंड्यावर लटकलेला रंगीबेरंगी पतंग दिसला की  वाटतं, 'बाऽप रे! एसेस्सीची प्रिलिम आली! आणि अभ्यास मुळीच नाही झालेला!'आणि पोटात भीतीचा गोळा येतो.


रंगीबेरंगी पतंग

पतंग आणि सूर्य ह्यांचं संक्रांतीशी असं घनिष्ट नातं आहे की संस्कृतमध्ये सूर्याला चक्क पतंग असं एक नाव दिलेलं आहे. संक्रांतीपर्यंत, सूर्याचा सात घोड्यांचा रथ दक्षिणेकडे तोंड करून धावत असतो. संक्रांतीला तो धनू राशीतून मकर राशीत शिरतो. हेच त्याचं संक्रमण म्हणजेच त्याच्या मार्गातला बदल. या वेळी तो यू टर्न घेतो आणि हिवाळ्याकडे पाठ फिरवून, उत्तरेकडे, शुभ दिशेला निघतो. इथून पुढचे सहा महिने उत्तरायणाचे. इच्छामरणी पितामह भीष्मांनी याच शुभकालाची वाट पाहिली. गंगेला स्वर्गातून जमिनीवर आणायला भगीरथाने हाच उत्तरायणाचा मुहूर्त निवडला. याच दिवशी संक्रांतिदेवीने संकासुर–किंकासुरांचा वध केला.

पण उत्तरायणाची सुरुवात तर २२ डिसेंबरला होते ना? मग चौदा जानेवारीचं काय?

आपली पृथ्वी स्वतःच्या आसाभोवती फिरते, सूर्याभोवती सुध्दा फिरते. चंद्र पृथ्वीभोवती फिरतो. चंद्र आणि सूर्य आपापल्या गुरुत्वाकर्षणाने पृथ्वीच्या आसाची ओढाताण करतात. तुम्ही भोवरा फिरताना पाहिला असेल. त्याची गती कमी झाली की त्याचा आस स्वतःभोवती पिंगा घालतो. चंद्रसूर्याच्या चढाओढीमुळे पृथ्वीचा आसदेखील तसाच पिंगा घालतो. ही त्याची गिरकी दाखवणारी आकृती सोबत जोडली आहे.







त्या आसाचं हें एक भ्रमणचक्र पुरं व्हायला २६००० वर्षं लागतात. त्यामुळे तेरा हजार वर्षं पृथ्वीचा उत्तर गोलार्ध सूर्याच्या दिशेने झुकतो आणि पुढची तेरा हजार वर्षं तो सूर्यापासून दूर वळत असतो. सध्या तो सूर्याच्या दिशेने झुकतो आहे. त्यामुळे उत्तरायण दर वर्षी २० मिनिटं लवकर होतं आहे. अशी तेरा हजार वर्षं पुरी झाली की उत्तर गोलार्ध सूर्यापासून दूर झुकायला लागेल. मग उत्तरायण दर वर्षी वीस मिनिटं उशीरा होईल.

या धनू काय, मकर काय, राशी मूळच्या आपल्या नव्हेत. आपलं मूळचं नातं होतं ते नक्षत्रांशी. राशींचं वाण आपल्याला ग्रीकांकडून, शिकंदराकडून मिळालं. म्हणजे इ.स. पूर्व ३०० च्या सुमाराला. त्या वेळी उत्तरायण मकरसंक्रांतीलाच होत होतं. पण तेव्हापासून गेल्या तेवीसशे वर्षात, ते हळूहळू बत्तीस दिवस पुढे सरकलं आहे.  तसं पाहिलं तर

डिसेंबर, जानेवारी हे सगळे महिने ग्रेगरी नावाच्या पोपच्या कॅलेंडरमधले. ह्या पोप ग्रेगरीने कॅलेंडरचा ताळमेळ ऋतुचक्राशी जुळवायला, १५८२ सालच्या पाच ऑक्टोबरला पंधरा ऑक्टोबर म्हटलं. आपल्या क्षय तिथींसारखे हे झाले दहा क्षय दिवस. त्यामुळे हा खरा बत्तीस दिवसांचा फरक आता बावीस दिवसांचा होऊन सध्या सूर्य आपला रथ बावीस डिसेंबरला उत्तरेला वळवायला लागला आहे.

सध्याच्या परिस्थितीत आपल्याला एका वेगळ्या उत्तरायणाची गरज आहे. २००९ साल सुरू झालं तेच टेररिस्ट अॅटॅकच्या पार्श्वभूमीवर. थंडीऐवजी भीतीने अंगावर काटा उभा राहिला. मग असत्याच्या भाराखाली सत्यम् कोसळली. शेअरबाजार रोजच वरखाली गटांगळ्या खायला लागला. सगळीकडे अस्थिरता माजली. आणि अशा या आर्थिक आणि सामाजिक अराजकाच्या काळात ही संक्रांत, हा ग्रहगोलांच्या बदलाचा मुहूर्त आला. आता तरी ग्रह बदलून आतंकाच्या, अफरातफरीच्या काळिम्याकडून सत्याच्या, उत्कर्षाच्या प्रकाशाकडे भारताचं सुरळीत संक्रमण होईल अशी आशा निर्माण झाली.

आपण हाडाचे भारतीय. टेररिस्टांच्या हल्ल्यांनी न डगमगणारे. जगण्यावर उत्कट प्रेम करणारे. आतंकी हल्ल्यांनी नाउमेद झालो, सण साजरे केले नाहीत तर टेररिस्टांचा डाव साधलाच ना? म्हणूनच आपण या वर्षी संक्रांतीचा सण नेहमीच्याच उत्साहाने आणि एका अदम्य आशावादाने साजरा केला.

आणि मग ए.आर. रेहमानला गोल्डन ग्लोब अॅवॉर्ड, संगीताचा सध्याचा जगातला सर्वोच्च बहुमान मिळाला. आणि आता तर त्याला तीन ऑस्कर नॉमिनेशन्सही मिळालीं. म्हणावंसं वाटलं, "रेहमान, तुझे सलाम!" ऑस्ट्रेलियावरचा क्रिकेटमधला विजयसुध्दा एक शुभशकुनच म्हणायचा. आता इंग्लंडवरचा विजय धरायचा नाही. कारण इंग्लंड, झिम्बाब्वे आणि पोपटवाडी हे सगळे कच्चे लिंबू. पण एकूण काय? भारताचा शुभप्रवास सुरू झाला.

संक्रांत कितीही शुभ असली तरी मराठीत कशावरही संक्रांत येणं म्हणजे त्या गोष्टीचा नाश होणं असा अर्थ होतो. मी सात–आठ वर्षांची असताना एकदा माझ्या दातावर संक्रांत आली होती, तिळाच्या लाडवामुळे. या वर्षीची संक्रांत कुणाच्या दातांवर नको, संकासुरावर नको की किंकासुरावर नको. ती या वर्षी आतंकासुरावर यावी एवढीच प्रार्थना आहे.

डॉ. उज्ज्वला दळवी
सौदी अरेबिया
२२ जानेवारी २००९.